# विवेकानंद संख्याशास्त्र विभागाच्यावतीने कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : सध्याच्या युगात संख्याशास्त्राचे महत्त्व खूप वाढले असून प्रत्येक क्षेत्रामधला त्याचा वापर वाढला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रक्रियेमध्ये संख्याशास्त्रास अनन्यसाधारण महत्त्व असून हे समजून घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेजमधील संख्याशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संख्याशास्त्र यांच्या आधुनिक युगातील समन्वयाचे अन्वेषण या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले की, अशा कार्यशाळेत मधून विषयाचे महत्त्व समजण्यास मदत होते त्याचबरोबर तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याचे अचूक ज्ञान प्राप्त होते.

**Global Times: Tuesday, 16th January 2024**

**News of Lead College Activity**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ★ (Empowered Autonomous)
ESTD JUNE 1964